तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, 02230233410/443 फॅक्स - 22692102.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dte.org.in

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१४/३८८
दिनांक : 13 MAY 2014

## सन २०१४-१५ च्या मान्यता प्रक्रीयेसाठी जाहीर सूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/०५(०२)/२०१४] एआयसीटीई अ‍ॅप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक (२०१३-१४), जे (२०१४-१५) साठी अंगीकृत करण्यात आले आहे त्यामधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. १८ मे, २०१४ पर्यन्त मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2014/ ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून तपशिलवार अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी, विद्यमान संस्थाच्या संस्था प्रमूखांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. १८.०५.२०१४ पर्यंत परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती विहित कालमर्यादेत ऑन लाईन पध्दतीने भरून सुनावणीसाठी विहित केलेल्या दिनांकास आवश्यक त्या कागदपत्रांसह व्यक्तीश: उपस्थित रहावे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन तांत्रिक शिक्षण संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थांचे नवीन जागेत हस्तांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. १८.०५.२०१४ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सिस्टीम मॅनेजर, आय टी सेल यांना संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/शैवि-३/प्रस्ताव/२०१४/1516
दिनांक : 16 MAY 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, 02230233410/443 फॅक्स - 22692102.

E-mail : dtedesk@gmail.com Internet : http://www.dte.org.in


क्रमांक: 2/एनेजीसी/मान्यता/2014/ 368

दिनांक : 13 MAY 2014

## अधिसूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/०५(०२)/२०१४] एआयसीटीई ॲप्रूव्हल प्रोसेस हॅण्डबुक (२०१३-१४), जे (२०१४-१५) साठी अंगीकृत करण्यात आले आहे त्यामधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. १८ मे, २०१४ पर्यन्त मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2014/ ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. १८.०५.२०१४ पर्यंत माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १८.०५.२०१४ पर्यंत ऑन-लाईन पध्दतीने ज्या संस्था माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करतील अशा संस्थाची सुनावणी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे आयोजित करण्यात येणार आहे.

विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या व शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नविन तांत्रिक शिक्षण संस्थेच्या संस्था प्रमूखांच्या निदर्शणास आणण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलबध आहे. तरी परिषदेस प्रस्ताव सादर करतांना बृहत् आराखडयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घ्याव्यात.

| अ.क्र. | विभाग | सुनावणीचा दिनांक व | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मुंबई व नाशिक विभाग | दि. २१.०५.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता | तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई |
| २ | पुणे व औरंगाबाद विभाग | दि. २२.०५.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता | |
| ३ | अमरावती व नागपूर विभाग | दि. २३.०५.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता | |

उपरोक्त सुनावणीस येतांना खालील कागदपत्रे, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१३-१४ च्या ॲप्रूव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक ती कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

१. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांचे कार्यालयात सुनावणीपूर्वी अदा करणे आवश्यक असून सदर शुल्क अदा केल्याच्या पावतीची छायांकीत प्रत.

२. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
३. डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office).
४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] प्रत.
५. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर अॅनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
६. जमिन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र
७. अभ्यासक्रम बंद करणे तसेच मंजूर असलेल्या प्रवेश क्षमतेत घट करणे या संदर्भातील अर्जाबाबत संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, या आशयाचे रु.१००/- चे नोंदणीकृत लेखी बंधपत्र / हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

उपरोक्त अ.क्र. १ ते ७ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांचा १ संच (स्पायरल बाईंडींग) सुनावणीच्या वेळी या कार्यालयास जमा करण्यात यावा

येथे असेही सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थांचे नवीन जागेत हस्तांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. १८.०५.२०१४ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रस्तुत विषयाबाबत येथे असेही सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्या सर्व प्रस्तावांची (EOA च्या प्रस्तावासह) प्रत संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडेच जमा करण्यात यावी.**

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २१.०८.२०१३ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच नवीन संस्थांचे प्रस्ताव व संस्था हस्तांतरण व संस्था बंदच्या प्रस्तावाबाबत प्रत्यक्ष तपासणी करुन त्यांबाबतचा अहवाल दि. २२.०५.२०१४ पर्यंत संचालनालयास सादर करावा.
२) सिस्टीम मॅनेजर, आय.टी सेल यांना संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/शैवि–३/प्रस्ताव/२०१४/ 1517
दिनांक : 16 MAY 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/२०१४/ ३८२
दिनांक : 16 MAY 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेतील बदल इत्यादी प्रस्तावांच्या मान्यतेबाबत व सुनाणीबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहीर सूचना (Advt.No.:Approval/05(02)/2014)
२. संचालनालयाची अधिसूचना क्र.२/एनजीसीस/मान्यता/२१४/३७८ दि. १३ मे, २०१४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन क्र.१ च्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या जाहिर सूचनेस अनुसरुन संचालनालयाने संदर्भ क्र.२ ची अधिसूचना जाहिर केलेली असून, एअयसीटीई अप्रुवल प्रोसेस हॅण्डबुक (२०१३-१४), जे (२०१४-१५) साठी अंगीकृत करण्यात आले आहे त्यामधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. १८ मे, २०१४ पर्यंत मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांसंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती (**संस्था बंद, संस्थेत सुरु असलेले अभ्यासक्रम बंद करणे, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमता वाढ/घट, संस्थेच्या नावात बदल, पत्यात बदल, संस्थेचे को-एज्युकेशन रुपांतरण करणे, इत्यादी. बाबत**) भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2014/ हि लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. १८.०५.२०१४ पर्यंत माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (confirm) करण्यात यावी. संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १८.०५.२०१४ पर्यंत ऑन-लाईन पध्दतीने ज्या संस्था महिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (confirm) करतील अशा संस्थांची सुनावणी संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली असून, सदर संस्थांच्या प्राचार्यांनी संदर्भ क्र.२ च्या अधिसूचनेनुसार सर्व कागदपत्रे घेऊन सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे अनिवार्य राहील असे आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना सूचित करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/शैवि—३/प्रस्ताव/२०१४/ 1515
दिनांक : 16 MAY 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय
नागपूर